प्रसिध्दी पत्रक दिनांक. २०/१०/२०२३

**आरोपी लोकसेवक संतोष विठ्ठलराव साखरे, वय ३९ वर्षे व्यवसाय नोकरी लिपीक (वर्ग–३), सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी, रा. राम नगर, परभणी यांनी सेवापुस्तकाची पडताळणी करण्यासाठी ४,०००/– रू. लाचेची मागणी करून स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी युनिट. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | नवामोंढा परभणी गु.र.नं. ४१६/२०२३ कलम ७, ७A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख वेळ | दि. २०/१०/२०२३ रोजी ००.४९ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | संतोष विठ्ठलराव साखरे, वय ३९ वर्षे व्यवसाय नोकरी लेखा परिक्षा लिपीक (वर्ग–३), सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी रा. राम नगर, परभणी. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/– रू. ( चार हजार रूपये ) |
| लाचेची स्विकारली रक्कम | ४,०००/– रू. ( चार हजार रूपये ) |
| शोडक्यात माहिती | सदर गुन्हयातील तक्रारदार यांनी त्यांच्या मयत आईच्या नावे असलेल्या सेवापुस्तकाची लेखा परिक्षण विभागामार्फत पडताळणी करण्यासाठी आरोपी लोकसेवक लेखा परिक्षा लिपीक याने लेखा परिक्षा अधिकारी बुरकुले यांचेकडून पडताळणी करून घेतो असे म्हणून ६,०००/– रू लाच मागणी केली. सदर रक्कम ही लाच असल्याने ती तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १९/१०/२०२३ रोजी ए.सी.बी. परभणी कार्यालयात रितसर तक्रार दिली. त्यावरून दि. १९/१०/२०२३ रोजी पंचा समक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवकयाने तक्रारदार यांना सांगितले की तुमच्या आईच्या नावे असलेल्या सेवापुस्तकाची लेखा परिक्षण विभागामार्फत पडताळणी करण्यासाठी ६,०००/– रू. लागतील. त्यावरून तक्रारदार यांनी एवढे पैसे कशाला लागतात, काही तरी कमी करा असे म्हणाले. तडजोडीअंती साहेबासाठी ३,०००/– रू. व स्वत:साठी १,०००/– रू. अशी ४,०००/– रूपयाची मागणी केली. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही मध्ये आलोसे याने तक्रारदार यांचेकडुन ४,०००/– रू. पंचासमक्ष फाईलमध्ये ठेवण्यास सांगुन स्विकारले त्याच वेळी ताब्यात घेवुन आलोसे साखरे यांचे वरिष्ठ बुरकुले यांची पडताळणी केली असता त्यानी लाचेची मागणी केली नाही. आलोसे साखरे यांनी लाच रक्कम दिनांक १९/१०/२०२३ रोजी स्विकारले त्यावरून आलोसे साखरे त्याचेविरूध्द पो.स्टे. नवामोंढा, परभणी येथे दि. २०/१०/२०२३ रोजी गु.र.नं. ४१६/२०२३ कलम ७, ७A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेडचे डॉ. श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, पोह/चंद्रशेखर निलपत्रेवार, पोशि/अतुल कदम ला.प्र.वि. युनिट परभणी. |
| गुन्हयाचा तपास | श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. युनिट परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवक/इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रितिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :– कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी शनिवार बाजार, नानलपेठ, परभणी | |
| संपर्क क्रमांक :– ०२४५२–२२०५९७, टोल फ्री क्रमांक:– १०६४ | ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक ९६२३९९९९४४ | पोलीस उप अधीक्षक ९८५०४८३३३७ |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook: Anti Corruption Bureau Parbhani<br>Instagram: acbparbhani | Twitter:@ACBPARBHANI |

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड | :– | ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | :– | ९८५०४८३३३७ |
| ३) | श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | :– | ९८८११४१२१८ |
| ४) | श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | :– | ९८२३६१६१४२ |

(अशोक इप्पर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी.